मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com

। पश्चिम महाराष्ट्र ।

follow us : /rajdandlive



विद्युत रोषणाईची चमक दमक.. पुढील महिन्यात येऊ घातलेल्या गणेशोत्सवासाठी गणेश भक्तांची लगबग आतापासूनच दिसू लागली आहे.

RNI Regd. No. 72105/99 · वर्ष २६ · अंक ३२४ · सातारा · शनिवार दि.२४ ऑगस्ट २०२४ · पाने ४ · किंमत ५/- रूपये

# महाराष्ट्र बंद बेकायदेशीर

## जर कोणी प्रयत्न केला तर..' मुंबई हायकोर्टाचा गंभीर इशारा



**मुंबई :** बदलापूर येथे अल्पवयीन मुलीवर अत्याचाराची घटना घडल्यानंतर राज्यात अनेक ठिकाणी उत्स्फुर्त आंदोलने पाहायला मिळाली. या घटनेनंतर महिला आणि मुलींच्या सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. याच पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीने उद्या (२४ ऑगस्ट) राज्यामध्ये बंद पुकारला आहे. दुसरीकडे हा बंद राजकीय प्रेरीत असल्याचा आरोप करत मुंबई उच्च न्यायालयात या बंद विरोधात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकाकर्त्यांमध्ये गुणरत्न सदावर्ते यांच्यासह इतरांचाही यामावेश आहे.

महाविकास आघाडीने आगामी विधानसभा निवडणुका लक्षात घेता उद्या राज्यामध्ये बंद पुकारला आहे. असा आरोप करत मुंबई उच्च न्यायालयात या बंद विरोधात याचिका दाखल करण्यात आल्या आहेत. या याचिकाकर्त्यांमध्ये गुणरत्न सदावर्ते यांच्यासह इतरांचाही यामावेश आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्रकुमार उपाध्याय यांच्या न्याय पीठापुढे या प्रकरणाची सुनावणी होत आहे.

ठाण्यातील बदलापूर आदर्श शाळेतील घटनेतील आरोपींना अटक झाल्यानंतरही जनआंदोलन सुरूच आहे. लोकांच्या निषेधाच्या पार्श्वभूमीवर म हाविकास आघाडीने उद्या म्हणजेच २४ ऑगस्ट रोजी महाराष्ट्र बंदची हाक दिली आहे. विरोधकांच्या या निर्णयाविरोधात मुंबई उच्च न्यायालयात अनेक याचिका दाखल झाल्या आहेत. या याचिकांवर आज सुनावणी होत आहे. प्रत्यक्षात या काळात शाळा, महाविद्यालये, बँका आणि इतर अनेक संस्था बंद राहिल्याने राज्यातील जनतेचे मोठे हाल होणार असल्याचा युक्तिवाद या बंदबाबत न्यायालयात करण्यात आला आहे. अशा स्थितीत हा बंद पुढे ढकलण्यात यावा, अशी मागणी करण्यात आली आहे.

### महाविकास आघाडीच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष

**दरम्यान, आता मुंबईत उच्च न्यायालयाने उद्याचा बंद हा बेकादेशीर असल्याचे म्हटल्याने महाविकास आघाडी नेमकी काय भूमिका घेते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. यावरून पुन्हा एकदा राज्यातील राजकीय वातावरण तापण्याची शक्यता आहे.**

### महाविकास आघाडीने दिली होती बंदची हाक

**बदलापूर तसेच राज्यातील इतर ठिकाणी झालेल्या महिलांवरील अत्याचाराच्या घटनेच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने महाराष्ट्र बंदची हाक दिली होती. महाविकास आघाडीचे नेते उद्धव ठाकरे, शरद पवार आणि नाना पटोले यांनी राज्यातील जनतेला महाराष्ट्र बंदमध्ये सहभागी होण्याचं आवाहन केलं होतं. उद्याचा बंद हा विकृती विरुद्ध संस्कृती, असा असून हा बंद राजकारणासाठी नाही, अशी भूमिका उद्धव ठाकरे यांनी मांडली होती. तसेच या बंद दरम्यान राज्यात अत्यावश्यक सेवा सुरू राहतील, असेही त्यांनी सांगितले होतं.**

वकील गुणवर्त सदावर्तेंचा युक्तीवाद काय?

बदलापुरातील ज्या घटनेसाठी विरोध होतोय तो योग्यच आहे. दोन लहान मुलींच्या बाबतीत जे काही घडलं. त्यासाठी आरोपीला फाशीच झाली पाहिजे. पण त्यासाठी कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होणं गरजेचं आहे. त्यासाठी संपूर्ण राज्याला वेठीस धरणं चुकीचं आहे. बदलापुरात त्या दिवशी १० तास लोकांनी रेल रोको केला. पोलिसांवर जमावाने दगडफेक केली. मात्र, अशा मुद्यांवर राजकारण होणे हे चुकीचे आहे. उद्याच्या बंदसाठी राज्यातील विरोधी पक्षानं कार्यक्रम जाहीर केला आहे. लोकल ट्रेन, बससेवा, रस्ते कसे बंद करायचे याचं नियोजन करण्यात आलं आहे. विरोध करण्याचा हा मार्ग राज्याच्या हिताचा नाही. यामुळे शाळा, महाविद्यालय, रूग्णालय यांना मोठा फटका बसेल. तसेच राज्याचा एका दिवसाचा कितीतरी मोठा महसूलही बुडेल. याचिकाकर्त्यांच्या वतीनं डॉ. गुणरत्न सदावर्ते यांनी युक्तिवाद केला.

उद्याचा महाराष्ट्र बंद बेकायदेशीर असल्याचा निर्णय मुंबई हायकोर्टाने दिला आहे. मुख्य न्यायमूर्ती देवेंद्र कुमार उपाध्याय आणि न्यायमुर्ती अमित बोरकर यांनी हा निर्णय दिला.

# गणेशोत्सवादरम्यान मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्गावर जड वाहनांना वाहतूक बंदी

**मुंबई :** गणेशोत्सव अवघ्या काही दिवसांवर आला आहे. राज्यात गणेशोत्सवाची तयारी सुरु झाली असून कोकणात गणेशोत्सवासाठी जाणारा चाकरमान्यासाठी तयारी करु लागला आहे. या दरम्यान, गणेशोत्सवासाठी गणेश मुर्तीचे आगमन, गणेशमुर्तीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवास यामुळे मुंबई ते गोवा राष्ट्रीय महामार्ग क्रमांक ६६ वर जड वाहनांना वाहतूक करण्यास बंदी करण्यात आली आहे. जड वाहनांमध्ये वजनक्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त वाहनांचा समावेश केला गेला आहे. ही बंदी मोटार वाहन अधिनियम १९८८ च्या कलम १५५ मधील तरतुदीनुसार करण्यात आली आहे.

गणेशोत्सवाच्या पूर्व तयारीचा प्रवास म्हणून ५ सप्टेंबर रोजी मध्यरात्री १२ वाजेपासून ते ८ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत या कालावधीत बंदी असणार आहे. तर ५ व ७ दिवसांच्या गणेशमुर्तीचे विसर्जन, गौरी गणपती विसर्जन, परतीचा प्रवासासाठी ११ सप्टेंबर रोजी रात्री ८ वाजेपासून ते १३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपर्यंत, अनंत चतुर्दशी ११ दिवसांचे गणेशमुर्तीचे विसर्जन, परतीच्या प्रवासाकरिता १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपासून ते १८ सप्टेंबर २०२४ रोजी रात्री ८ वाजेपर्यंत या कालावधीत बंदी राहील.

### या दिवशी वाहतुकीस परवानगी

**या महामार्गावर बंदी असलेल्या कालावधी व्यतिरिक्त उर्वरित कालावधीत ज्यांची वजन क्षमता १६ टन किंवा १६ टनांपेक्षा जास्त आहे, अशा वाहनांना ८ सप्टेंबर रात्री ११ वाजेपासून ते ११ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजता आणि १३ सप्टेंबर रोजी रात्री ११ वाजेपासून ते १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८ वाजेपर्यंत वाहतुकीस परवानगी राहील.**

# महिलांवरील अत्याचाराची जबाबदारी हायकोर्ट घेणार का?

## उद्धव ठाकरेंचा सवाल



**मुंबई :** राज्यातील महिलांवरील अत्याचाराच्या घटनांच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने उद्या (२४ ऑगस्ट) महाराष्ट्र बंद पुकारला आहे. कोणतेही सरकारी कार्यालय बंद ठेवण्याची परवानगी नाही, ते बंद असल्यास त्यावर कायदेशीर कारवाई करा, अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला दिल्या आहेत. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष शरद पवार यांनी बंद मागे घेण्याचे आवाहन करण्यात आले. यानंतर आता उद्धव ठाकरे यांनी देखील उद्याचा संप मागे घेतला आहे.

महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री आणि ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांनी बदलापूरच्या घटना रोखण्यासाठी महाराष्ट्र बंदची हाक दिली होती.. मात्र त्यांच्या अपीलानंतर वकील गुणरत्न सदावर्ते यांनी मुंबई उच्च न्यायालयात याचिका दाखल केली. या याचिकाकर्त्यांची उच्च न्यायालयाने आज प्राथमिक सुनावणी पार पाडली. यावेळी उच्च न्यायालय थांबवणार नसल्याचे सांगण्यात आले आहे. कोणत्याही राजकीय पक्षाला बंद करण्याची परवानगी नाही. असा प्रयत्न झाल्यास कायदेशीर कारवाई करा, अशा सूचना मुंबई उच्च न्यायालयाने सरकारला दिल्या आहेत. मुंबई उच्च न्यायालयाच्या आदेशानंतर राज्य सरकारने अंमलबजावणी सुरू केली आहे.

पोलिसांनी महाविकास आघाडीच्या अधिकाऱ्यांना नोटिसा बजावण्यास सुरुवात केली. यानंतर राष्ट्रवादी काँग्रेसच सर्वेसर्वा शरद पवार यांनी न्यायालयात एफआयआर दाखल करण्यास स्थगिती देण्याची मागणी केली. त्यांच्या आवाहनानंतर काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष नाना पटोले यांनीही न्यायालयाच्या आदेशानुसार महाराष्ट्र बंद मागे घेतल्याचे जाहीर केले.

यानंतर उद्धव ठाकरें यांनी पत्रकार परिषद घेऊन आपली भूमिका मांडली असून उद्धव ठाकरेंनीही आता महाराष्ट्र बंद मागे घेण्याचे आवाहन केले.

काय म्हणाले उद्धव ठाकरे?

उद्याच्या बंद बद्दल काही सूचना आज दिल्या होत्या. उद्याचा बंद विकृती विरोधी होता. होता हा शब्द वापरतो कारण कोर्टाने तत्परतेने या बंदला मनाई केली आहे. एका गोष्टीचं बरं वाटलं. कोर्ट एवढ्या तत्परतेने हलू शकतं हे कौतुकास्पद आहे. तुम्ही तत्परतेने निर्णय दिला, तशीच तत्परता तुम्ही जे गुन्हे घडता त्या आरोपीला शिक्षा देण्यासाठीही दाखवा.

न्यायालयाचा निर्णय मान्य नाही, पण न्यायालयाचा आदर ठेवावा लागतो. या निर्णयाविरोधात आम्ही या सर्वोच्च न्यायालयात जाऊ शकतो. मात्र न्यायालयात जाऊन निर्णय होण्यास थोडा वेळ लागेल.

नोटाबंदीचे कारण वेगळे होते. सर्वोच्च न्यायालयात जाण्यास वेळ नाही. त्यामुळे लोकांच्या मनात खळबळ माजून सर्वांनाच अडचण येईल. शरद पवार यांनी आवाहन केले आहे.आम्हीही बंद मागे घेत आहोत. पण गावात आणि शहरातील मुख्य चौकात आघाडीचे नेते कार्यकर्ते तोंडाला काळ्या फिती लावून निषेध करतील. आम्ही तोंडच बंद करू. देशात अभिव्यक्ती स्वातंत्र्य आहे की नाही. मोर्चे हडताळ यावर बंदी आहे का. लोकांनी भावना व्यक्त करू नये का. यावर घटना

# महाराष्ट्रातील ४१ पर्यटकांच्या बसचा नेपाळमध्ये अपघात

## १४ जणांचा मृत्यू



**जळगाव :** नेपाळला पर्यटनासाठी गेलेल्या महाराष्ट्रातील ४१ जणांच्या बसचा भीषण अपघात झाला. बस नदीत कोसळून झालेल्या या दुर्घटनेत १४ पेक्षा जास्त जणांचा मृत्यू झाला आहे. मृतांमध्ये महाराष्ट्रातील भाविकांचा सम ावेश असल्याची माहिती समोर आली आहे.

मंत्री अनिल पाटील यांनी माहिती देताना म्हटलं की, तासाभरापूर्वी मला ही माहिती मिळालेली आहे. जळगावचे जिल्हाधिकारी यांच्याशी मी तात्काळ संपर्क केला आहे. - ४१ भाविक दर्शनासाठी गेले होते आणि ती बस आता नदीमध्ये कोसळलेली आहे अशी प्राथमिक माहिती आहे.अंदाजे १५ ते १६ मृतदेह सापडले असल्याचेही सांगण्यात आले आहे.

पोखराहून काठमांडूला निघालेल्या पर्यटकांची बस मुखलिसपूरजवळ दरीत कोसळली. गोरफूरच्या केसरवानी ट्रॅव्हल्समध्ये महाराष्ट्रातील ४१ प्रवासी होते. गोरखपूरच्या चालकासह १४ जणांचा मृत्यू झाल्याची माहिती समोर येत आहे. प्रयागराज रेल्वे स्थानकाहून महाराष्ट्रातील ११० पर्यटकांचा ग्रुप चित्रकूटला गेला. तिथून अयोध्या, लुम्बिनी मार्गे ते नेपाळच्या पोखरा इथं पोहोचले. आज ते काठमांडूला निघाले होते.

नदीत कोसळून बसचा पुरता चक्काचूर झाला होता. बसच्या वरचे छत उडाले होते, पुढच्या भागाचा सांगाडा वेगळा झाला होता. काहीजण वेदनेने विव्हळत होते, वाचवण्यासाठी याचना करत होते. नदीजवळच्या खडकावर मृतदेहांचा खच पडला होता. रक्तानं दगड माखले होते. जखमींचा आक्रोश होता. मन सुन्न करणारे अपघाताचे फोटो समोर आले आहेत. हा अपघात नेमका कशामुळे झाला याचे कारण अद्याप समोर आले नाही.

स्थानिक पोलीस आणि आपत्कालीन विभागाचे कर्मचारी प्रवाशांना रेस्क्यू करत आहेत. जखमींना तातडीने जवळच्या रुग्णालयात दाखल करण्यासाठी पाठवलं जात आहे. नेपाळच्या अधिकाऱ्याने दिलेल्या माहितीनुसार, बस पोखराहून काठमांडूला जात होती. अपघाता मृत्यूमुखी पडलेल्यांची माहिती मात्र अद्याप समोर आलेली नाही. त्यांची नावे समजू शकली नाहीत.

# मुख्यमंत्री पदावरून मविआत फुटणार वादाला तोंड?

**मुंबई :** महाविकास आघाडीच्या घटक पक्षातील कोणत्याही नेत्याचे नाव निश्चित करा. मात्र, विधानसभा निवडणुकीला सामोरे जाताना मुख्यमंत्री पदाचा चेहरा घोषित करा, असा शिवसेना उद्धव ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे यांचा आग्रह आहे. काँग्रेसला ही भूमिका अजिबात मान्य नाही. राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाने याबाबत कोणतेही भाष्य केले नसले तरीही ही भूमिका मान्य नसल्याचे अनुल्लेखातून स्पष्ट केले आहे. मुख्यमंत्रीपदाच्या चेहऱ्यावरून महाविकास आघाडीत वादाला तोंड फुटण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

विधानसभा निवडणुकीत मतदारांसमोर जाताना मुख्यमंत्रीपदाचा चेहेरा समोर आणावा, अशी मागणी ठाकरे आणि त्यांचे खासदार संजय राऊत सातत्याने करीत आहेत. काही काळापूर्वी उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे आणि खासदार संजय राऊत यांनी दिल्लीचा दौरा करून विधानसभा निवडणुकीची रणनीती निश्चित करण्यासाठी काँग्रेसच्या सर्वोच्च नेत्यांची भेट घेतली होती. या भेटीनंतर उद्धव ठाकरे हेच महाविकास आघाडीच्या मुख्यमंत्रीपदाचा चेहरा असतील, अशा बातम्या प्रसिद्ध झाल्या होत्या. मात्र, त्यात तथ्य नसल्याचे कालांतराने स्पष्ट होत आहे.

नुकत्याच मुंबई येथे पार पडलेल्या महाविकास आघाडीच्या संयुक्त मेळाव्यात राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार, काँग्रेस प्रदेशाध्यक्ष नाना पटोले, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते पृथ्वीराज चव्हाण यांच्या उपस्थितीत मुख्यमंत्रीपदाचा उमेदवार जाहीर करण्याची मागणी उद्धव ठाकरे यांनी केली. पटोले यांनी त्याला जाहीरपणे नकार दिला तर शरद पवार यांनी मुख्यमंत्री पदाबाबत कोणताही उल्लेख करण्याचे टाळून ठाकरे यांच्या मागणीकडे दुर्लक्ष केले.

पत्रकारांची अनौपचारिक संवाद साधताना देखील ठाकरे यांनी मुख्यमंत्री पदाचा उमेदवार जाहीर करण्याची आवश्यकता व्यक्त केली. ज्या पक्षाचे अधिक आमदार त्यांचा मुख्यमंत्री असे सूत्र ठरवले गेल्यास एकमेकांचे उमेदवार पाडण्याचे काम केले जाते. युतीच्या काळात असे प्रकार घडले आहेत, असा दावाही ठाकरे यांनी केला होता.

पृथ्वीराज चव्हाण यांनी याबाबत पक्षाची भूमिका स्पष्टपणे मांडली आहे. महाराष्ट्रात जो पक्ष विरोधात बसला असेल तो पक्ष निवडणुकीला सामोरे जाताना मुख्यमंत्री पदाचा चेहरा जाहीर करण्याची परंपरा नाही. युती किंवा आघाडीत ज्या पक्षाचे अधिक उमेदवार निवडून येतील त्या पक्षाचा मुख्यमंत्री होईल,



# बदलापूरसारख्या नराधमांना काय शासन व्हावे

## राज ठाकरेंनी एकच शिक्षा सांगितली, म्हणाले, चौरंग करा!

**मुंबई :** नुकतीच बदलापूरम ध्ये जी काही एका चिमुकलीवर अत्याचाराची घटना झाली, ही घटना खऱ्या अर्थाने आमच्या म नसेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी पुढे आणली. तेव्हा ती घटना सर्वांपुढे आली असून तोपर्यत ही घटना दाबूनच ठेवली होती. या घटने पाठोपाठ राज्यात इतरही अनेक ठिकाणी असेच प्रकार घडत असल्याचे आता पुढे येऊ लागले आहेत. म हाराष्ट्रासारख्या राज्यात लहान लहान मुलींवर बलात्काराच्या घटना होत आहेत. अशा वेळी वाटते छत्रपती शिवाजी महाराजांसारखी महाशक्ती आज खऱ्या अर्थाने हवी होती. महाराजांनी रांझ्याच्या पाटलांचे हातपाय कापून जसा चौरंग केला होता, तसेच या नराधमांचे केले पाहिजे. असे स्पष्ट मत मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी व्यक्त केलेय. यवतमाळच्या वणी येथे आयोजित एका सभेमध्ये ते बोलत होते.

राज्यात राजरोस अशा घटना घडत आहेत. त्यामागील मुख्य कारण म्हणजे राज्यात कायद्याचा वचक उरलेला नाही. या सर्व प्रकरणात पोलिसांचा अजिबात दोष नाही. त्यांच्यावर जो वरच्या राज्यकर्त्यांचा दबाव असतो, त्या दबावामुळे त्यांना तसे वागावे लागते. कारण पोलिसांनी कुठल्या गोष्टी करायला घेतल्या तर पोलिसांचे निलंबन होते.

पोलिसांमागे चौकशा आणि निलंबनाच्या कारवाई केली जाते. मात्र जे लोक सत्तेत बसले आहे त्यांच्या कधीही चौकशी केली जात नाही. कुठली परिस्थिती हाताळण्यासाठी पोलिसांच्या हातात आज काहीही नाही. मात्र दोष द्यायची वेळ आलीच तर त्यांना जबाबदार धरले जाते.

अनेकांना असे वाटते की राज ठाकरे हे सहज बोलतात. मात्र, मी सहज कुठलीही गोष्ट बोलत नाही. आपण एकदा या राज ठाकरेच्या हातात या राज्याची सत्ता देऊन बघा. राज्य कसे हाताळले जाते हे मी तुम्हाला दाखवून देईल, कायद्याची भीती काय असते, हे मी तुम्हाला दाखवून देईल आणि परत महिलांकडे बघण्याची कुणाची वक्रदृष्टी होणार नाही, असा विश्वासही राज ठाकरे यांनी बोलताना व्यक्त केला.

# डाव्या आणि समविचारी पक्षांनी महाविकास आघाडीत यावे: शरद पवार यांचे आवाहन

**पुणे:** आगामी विधानसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीर डाव्या आणि समविचारी पक्षांनी एकत्र येऊन महाविकास आघाडीच्या झेंड्याखाली मतदारांना सक्षम पर्याय उपलब्ध करून द्यावा, असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी पत्रकारांशी बोलताना केले.

महायुतीला पर्याय उभा करण्यासाठी राज्यातील डाव्या आणि समविचारी पक्षांनी महाविकास आघाडीत सहभागी व्हावे, असे आवाहन करून पवार म्हणाले की, सर्व समविचारी पक्षांनी एकत्र येऊन लवकरात लवकर मतदार संघाबाबत निर्णय घ्यावा, उमेदवार निश्चित करावे आणि महायुती समोर प्रबळ पर्याय उपलब्ध करून द्यावा.

महाविकास आघाडीतील काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस शरद चंद्र पवार पक्ष आणि शिवसेना उद्धव ठाकरे गट यांची जागावाटपासंदर्भात बैठक आयोजित करण्यात आली होती. मात्र, बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणामुळे ही बैठक पुढे ढकलण्यात आली. आता २७ तारखेला महाविकास आघाडीच्या घटक पक्षांची बैठक होणार असून त्यात जागावाटपाचे सूत्र निश्चित करण्यात येणार आहे.

आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे अयोग्य

बदलापूर लैंगिक अत्याचार प्रकरणी झालेले आंदोलन ही लोकांची संतप्त प्रतिक्रिया होती. उत्स्फूर्तपणे व्यक्त झालेली जनभावना होती. त्यामुळे सरकारने आणि गृहमंत्रालयाने हे प्रकरण संवेदनशीलतेने हाताळणे गरजेचे आहे. याप्रकरणी आंदोलकांवर गुन्हे दाखल करणे

# राज्यसभेच्या उमेदवारीत विधानसभेची बेरीज

**महाराष्ट्र, हरियाणा, बिहार, झारखंड, जम्मू-काश्मीर या राज्यांच्या विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. उत्तर प्रदेशात दहा जगांच्या पोटनिवडणुका होत आहेत. त्यातच राज्यसभेतील बीजू जनता दल, वायएसआर काँग्रेस हे संकटकालीन मित्र आता विरोधी आघाडीत गेले आहेत. लोकसभेत बहुमत असले, तरी मित्रपक्षांच्या मर्जीवर चालावे लागत असल्याने आता भारतीय जनता पक्षाने आठ राज्यांत राज्यसभा निवडणुकीत उमेदवारी देताना या सर्व बाजूंचा विचार केला आहे.**

राज्यसभेतील जागा वाढण्याबरोबरच विधानसभेच्या निवडणुकीत कसा फायदा होईल, तसेच काही ठिकाणी अंतर्गत गटबाजी टाळण्यासाठी स्थानिक उमेदवार न देता बाहेरचे उमेदवार देण्यात आले आहेत. हे करताना स्मृती इराणी, रावसाहेब दानवे यांच्यासारख्या काहींना संसदेत परतण्यासाठी आणखी काही काळ वाट पाहण्याचा संदेश भाजपच्या शीर्षस्थ नेतृत्वाने दिला आहे. भारतीय जनता पक्षाने (भाजप) आठ राज्यांतील नऊ जागांवर होणाऱ्या पोटनिवडणुकांसाठी उमेदवारांची यादी जाहीर केली आहे. बिहारमधील सहयोगी उपेंद्र कुशवाहासाठी एक आणि महाराष्ट्रात उदयनराजे भोसले यांच्या लोकसभा निवडणुकीने रिक्त झालेली जागा अजित पवार यांच्या राष्ट्रवादी काँग्रेसला सोडली आहे. नुकत्याच अन्य पक्षातून आलेल्या किरण चौधरी यांना हरियाणामधून भाजपने उमेदवारी दिली आहे. विधानसभा निवडणुकीतील गणित डोळ्यासमोर ठेवून ही उमेदवारी देताना अन्य पक्षातून आलेल्यांचा आम्ही सन्मान करतो, असा संदेश दिला आहे. अर्थात त्यामुळे स्थानिक काही नेते दुखावले असले, तरी सध्या बाहेरच्यांना पायघड्या आणि घरच्यांना सतरंज्या ही भाजपच्या राजकारणातील नवी व्यूहनीती आहे. मध्य प्रदेश आणि राजस्थान या दोन राज्यांतून केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन आणि रवनीत सिंग बिट्टू यांना राज्यसभेवर पाठवण्यात येणार आहे. हरयाणात काँग्रेस खासदार दीपेंद्र सिंह हुड्डा यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या पोटनिवडणुकीत भाजपकडून रवनीत सिंह बिट्टू यांच्या नावाची चर्चा होती. राज्यात १ ऑक्टोबरला विधानसभा निवडणुकाही होणार आहेत. अशा परिस्थितीत पक्षाने नंतर पंजाबमधून आलेल्या बिट्टूला उमेदवार बनवून नुकसान होऊ नये, म्हणून आपला हेतू बदलला. माजी मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांचे निकटवर्तीय तरुण भंडारी यांच्या नावाचीही चर्चा होती. हिमाचल प्रदेशमध्ये भाजपचे उमेदवार हर्ष महाजन यांच्या विजयाचे श्रेय पंचकुलाचे माजी महापौर भंडारी यांना दिले जाते. कॅप्टन अभिमन्यू, ओपी धनखर, रणजितसिंग चौटाला यांसारखे जाट दिग्गजही तिकीटाच्या शर्यतीत होते. कुलदीप बिश्नोई यांच्यासह राज्यातील पक्षाचे दलित चेहरे अशोक तन्वर आणि बंतो कटारिया हेदेखील राज्यसभेसाठी इच्छुक होते; मात्र भाजपने अनेकांना दुर्लक्षित करून किरण चौधरी यांना उमेदवारी दिली. यामागे पक्षाचे एक स्वतःचे गणित आहे. हरियाणात जाटेतर राजकारणावर लक्ष केंद्रित करणाऱ्या भाजपने या वेळी किरण चौधरी यांच्या माध्यमातून बन्सीलाल यांच्या वारशाचा फायदा घेण्यावर लक्ष दिले आहे. जाट व्होट बँक फोडण्याची भाजपची या वेळी रणनीती आहे.

भूपेंद्रसिंग हुड्डा यांच्यावर काँग्रेस जास्त अवलंबून राहिल्यामुळे, गैर-जाट जाती भाजपच्या बाजूने एकत्र येतील, असे पक्षाला वाटते. अशा परिस्थितीत काही जाट मतांनी किरण यांना पाठिंबा दिल्यास त्यांचा राज्यातील सत्तेचा मार्ग सुकर होऊ शकतो. राज्यात सुमारे २५ टक्के जाट आहेत, हे विशेष. किरण हा महिला चेहरा असून त्या दीर्घकाळ राजकारणात आहेत. महिला मतदारांमध्ये नारी शक्ती वंदन कायद्याला एक उपलब्धी म्हणून घेणाऱ्या भाजपची रणनीती म्हणजे किरणला राज्यसभेवर पाठवून महिलांनाही प्रतिनिधित्व देण्याचे काम पक्ष करत असल्याचा संदेश देण्याची आहे. भाजपने केंद्रीय मंत्री जॉर्ज कुरियन यांना मध्य प्रदेशातून आणि रवनीत सिंह बिट्टू यांना राजस्थानमधून तिकीट दिले आहे. दोन्ही राज्यात तिकीटाचे अनेक दावेदार होते. अशा स्थितीत स्थानिक समीकरणे सोडवण्यासाठी भाजपने बाहेरच्यांना तिकीट दिले आहे. मध्य प्रदेशात ज्योतिरादित्य शिंदे लोकसभेवर निवडून आल्यानंतर त्यांनी राज्यसभेच्या सदस्यत्वाचा राजीनामा दिला. तिथे अनेक शक्तिशाली नेते तिकीटाचे दावेदार होते. माजी मंत्री नरोत्तम मिश्रा,जयभान सिंग पवैय्यापासून सुरेश पचौरी, केपी यादव, चौधरी मुकेश सिंह चतुर्वेदी, रजनीश अग्रवाल आणि कांतदेव सिंह असे अनेक नेते गुडघ्याला बाशिंग बांधून होते. स्थानिक दावेदारांमध्ये कोणत्याही नावावर एकमत नव्हते. नेते कुणाच्या नावाने तर कार्यकर्ते कुणाच्या नावाने नाराजी व्यक्त करत होते. कुणाच्या फिल्डिंगमुळे जातीची गणिते बिघडतील, असे तर्कवितर्क लावले जात होते, तर कुणाच्या येण्याने भांडण होण्याची भीती व्यक्त केली जात होती. या सर्व बाबी लक्षात घेऊन भाजपने स्थानिक चेहऱ्याऐवजी केरळमधून आलेल्या कुरियन यांना उमेदवारी दिली. ज्योती मिर्धा, सतीश पुनिया, राजेंद्र राठौर आणि अरुण चतुर्वेदी यांसारखे दिग्गज राजस्थानमधील एका जागेसाठी तिकीटाच्या शर्यतीत होते. गटबाजीला संधी मिळू नये, हे लक्षात घेऊन भाजपने पंजाबच्या बिट्टू यांना पोटनिवडणुकीत उमेदवारी दिली आहे. पंजाबच्या सीमेला लागून असलेल्या राजस्थानच्या श्रीगंगानगर आणि आसपासच्या भागात शीख समुदायाचा चांगला प्रभाव आहे. बिट्टू यांना राज्यसभेवर पाठवून या भागातील राजकारणाचे गणित सोडविण्याचा विश्वास पक्षाला आहे. भाजपने बिहारमधून मनन कुमार मिश्रा यांना उमेदवारी दिली आहे. भाजपने आपला सहयोगी भागीदार आरएलएम प्रमुख उपेंद्र कुशवाह यांना एक जागा सोडून ओबीसींना आकर्षित करण्याचा प्रयत्न केला आहे. पुढच्या वर्षी बिहारमध्ये विधानसभेच्या निवडणुका आहेत. तिथल्या ओबीसी मतदारांसाठी भाजपची ही खेळी आहे. ऋतुराज सिन्हा यांच्यासोबत माजी केंद्रीय मंत्री आरके सिंह हेही बिहारमधील दोन जागांवर तिकिटासाठी दावा करत होते. कुशवाह हे कोरी जातीतून आलेले आणि राज्याच्या राजकारणात नितीश कुमार यांच्यासह लव-कुश (कोरी-कुर्मी) यांना बळ देणारे नेते मानले जातात. लोकसभा निवडणुकीत करकट जागेवरून बिहार भाजपचे कार्यकारिणी सदस्य असलेले पवन सिंह यांना उमेदवारी दिल्याने कोरी समाजात नाराजी असल्याचीही चर्चा आहे. बिहारमधील कोरी-कुशवाहाची लोकसंख्या सुमारे दहा टक्के आहे. यादवांनंतर ओबीसी जातींमध्ये ती सर्वाधिक आहे.

'सीएसडीएस' लोकनीतीनुसार, नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत कोरी-कुर्मी समाजाच्या ६७ टक्के मतदारांनी राष्ट्रीय लोकशाही आघाडीला मतदान केले. २०१९ मध्ये मिळालेल्या ७९ टक्के मतांपेक्षा ते १२ टक्के कमी आहे. याउलट, गेल्या निवडणुकीत या विभागातून दहा टक्के मते मिळवू शकलेल्या 'इंडिया' आघाडीतील पक्षांना या वेळी १९ टक्के मते मिळाली. २०२० च्या बिहार विधानसभा निवडणुकीत कोरी (कुशवाह) समुदायाने 'एनडीए'ला ५१ टक्के मते दिली आणि विरोधी महाआघाडीला फक्त १६ टक्के मते दिली. राष्ट्रीय जनता दलाने अभय कुशवाह यांना लोकसभेतील पक्षाच्या संसदीय पक्षाचे नेते म्हणून नियुक्त करून संदेश दिला आहे, की त्यांचे लक्ष आता या व्होटबँकेवर आहे. याची जाणीव ठेवून भाजपने पुढील वर्षी होणाऱ्या विधानसभा निवडणुकीपूर्वी नाराज कुशवाह मतदारांना पुन्हा आपल्या गोटात आणण्याच्या रणनीतीवर काम सुरू केले आहे. महाराष्ट्रात चार महिन्यांत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. निवडणुकीच्या वर्षात मराठा आरक्षण आंदोलन सरकारसाठी अडचणीचे ठरले आहे. मराठा आरक्षण आंदोलनाचे नेतृत्व करणाऱ्या मनोज जरांगे पाटील यांनी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना आरक्षणविरोधी म्हणत आघाडी उघडली आहे. अशा वातावरणात उदयनराजे भोसले आणि पीयूष गोयल यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या राज्यसभेच्या एका जागेवर भाजपने धैर्यशील पाटील यांना उमेदवारी दिली आहे. या निर्णयाला एका दगडात तीन पक्षी मारण्याच्या रणनीतीशी जोडले जात आहे. धैर्यशील पाटील हेदेखील मराठा समाजातील आहेत. नुकत्याच झालेल्या लोकसभा निवडणुकीत भाजपला महाराष्ट्रात जागांचे नुकसान सहन करावे लागले. अशा स्थितीत विधानसभा निवडणुकीबाबत दक्ष असलेल्या भाजपकडून मराठा समाजाची नाराजी कमी करण्याचा प्रयत्न सुरू आहे. या रणनीतीअंतर्गत पक्षाने मराठा कार्ड खेळले आहे. धैर्यशील यांच्या माध्यमातून कोकण विभागाचे गणित दुरुस्त करण्याची भाजपची रणनीती आहे. या प्रदेशात विधानसभेच्या ३९ जागा आहेत. हा परिसर शिवसेनेचा बालेकिल्ला राहिला आहे. धैर्यशील यांनी शेकाप सोडून गेल्या वर्षीच लोकतसभेच्या निवडणुकीत उमेदवारी मिळेल, या अपेक्षने भाजपमध्ये प्रवेश केला होता; परंतु महायुतीत अजित पवार सहभागी झाल्याने रायगड लोकसभेची जागा सुनील तटकरे यांच्यासाठी सोडावी लागली. त्यामुळे अगोदर अशोक चव्हाण आणि आता धैर्यशील पाटील या इतर पक्षांतील नेत्यांना राज्यसभेवर पाठवून पक्षाने इतर पक्षांच्या नेत्यांना संदेश दिला आहे, की बाहेरून आलेल्यांचाही पक्षात सन्मान केला जातो. विधानसभेच्या निवडणुकीसाठी अन्य पक्षातील मोठ्या नेत्यांना भाजपत पायघडया घालून स्वागत केले जाईल, हा संदेश त्यातून दिला आहे.

---



# अपक्ष की तुतारीवर लढायचे?

## समरजीत घाटगेंकडून कार्यकर्त्यांना तीन प्रश्न, उत्तरही मिळाल!

**कोल्हापूर :** कागलमध्ये पुन्हा एकदा आपल्याला स्वराज्य निर्माण करायचे आहे आणि त्यासाठी आपण सगळ्यांनी निर्धार केला पाहिजे. कागलच्या हितासाठी जो निर्णय घ्यायला लागेल तो निर्णय घेण्यासाठी तयार असल्याचे सांगत समरजित घाटगे यांनी आगामी विधानसभेला तुतारी फुंकण्यावर शिक्कामोर्तब केले आहे. आईसाहेब म्हणाल्या, जिंकायचं असेल तर तुतारी हाती घ्यायला पाहिजे. आता विषय माझा नाही, तर कागलच्या विकासाचा असल्याने समरजित यांनी सांगितलं. समरजित घाटगे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षात प्रवेश करण्यासाठी प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील आणि शरद पवार यांच्या भेटीगाठी झाल्याचेही कार्यकर्त्यांच्या मेळाव्यामध्ये जाहीरपणे सांगितले.

इथून पुढे तुम्हाला त्रास होणार, सरकारी ताकद लावली जाईल

दरम्यान, हा निर्णय घेत असताना माझ्या वरिष्ठ नेत्यांशी बोललो असल्याचेही समरजित घाटगे म्हणाले. नेत्यांना सांगून करण्यासाठी धमक लागते. प्रेम केलं तर तन-मन-धन करून करायचं. इथून पुढे तुम्हाला त्रास होणार, सरकारी ताकद लावली जाईल, पण हा समरजित तुमच्या पाठीशी असल्याचे ग्वाही कार्यकर्त्यांना दिलीय सरकारी ताकद केवळ दोन महिने राहणार असल्याचे सांगत अप्रत्यक्षरित्या हसन मुश्रीफ यांना इशारा दिला.

आज समरजित घाटगे यांनी कागलमध्ये कार्यकर्त्यांचा मेळावा आयोजित केला. या मेळाव्यामध्ये ते काय बोलणार? याकडे लक्ष होतं. गेल्या काही दिवसांपासून ते तुतारी हाती घेणार असल्याची चर्चा रंगली होती. आजच्या मेळाव्यामधून तुतारी हाती घेण्यावर शिक्कामोर्तब झालं आहे. या मेळाव्यामध्ये प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील सुद्धा पोहोचणार असल्याने जयंत पाटील काय बोलणार याकडे सुद्धा लक्ष आहे.

माझ्या आणि शरद पवार साहेबांच्या भेटी झाल्या

दरम्यान समरजित घाटगे पुढे म्हणाले की, २०१९ मध्ये आपली तयारी नव्हती, पण आपण लढलो. आता विषय माझा नाहीतर कागलचा आहे. माझ्या आणि शरद पवार साहेबांच्या भेटी झाल्या. मला विचार करण्यास सांगितले. मी कागलच्या जनतेला विचारल्याशिवाय निर्णय घेणार नाही, असा निरोप त्यांना दिला होता. ते म्हणाले की आज जर निर्णय घेतला तर उद्यापासून कामाला लागावे लागेल. लोकांना समजावून सांगा समरजितला मत का करायचे, असेही घाटगे यांनी यावेळी कार्यकर्त्यांना आवाहन केले.

# वरळीमध्ये आदित्य ठाकरे विरुद्ध अमोल मिटकरी?

## बॅनर्समुळे चर्चांना उधाण, राजकीय वर्तुळात कुतुहल

**मुंबई :** मुंबईतील वरळीत अमोल मिटकरी यांचे भावी उमेदवार म्हणून बॅनर झळकले आहेत. वरळीत 'घड्याळ'वाला आमदार विजयी व्हावा, असा उल्लेख असलेले बॅनर झळकल्याचं पाहायला मिळत आहे. त्यामुळे महायुतीत अजित पवार गट वरळी मतदारसंघावर दावा करणार का? याकडे लक्ष लागलं आहे. दरम्यान, सध्या ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे वरळीचे आमदार आहेत, तर मनसे वरळीतून संदीप देशपांडे यांना उतरवण्याच्या तयारीत आहे. मिटकरींच्या नावानं वरळीत झालेल्या बॅनरबाजीमुळे राजकीय वर्तुळात काहीसं कुतुहल निर्माण झाल्याचं पाहायला मिळत आहे.

मुंबईतील वरळी भागात अनेक ठिकाणी अमोल मिटकरी यांचे भावी उमेदवार म्हणून बॅनर्स झळकले आहेत. मुंबई राष्ट्रवादीचे सरचिटणीस नागेश मढवी यांच्या नावानं शुभेच्छुक म्हणून हे बॅनर्स झळकले आहेत. अमोल मिटकरींच्या रुपानं एकदा वरळीत 'घड्याळ'वाला आमदार विजयी व्हावा असा उल्लेख बॅनर्सवर करण्यात आला आहे. सध्या ठाकरे गटाचे नेते आदित्य ठाकरे वरळीचे आमदार आहेत. तर मनसे वरळीतून संदीप देशपांडे यांना उतरवण्याच्या तयारीत आहे. मिटकरींच्या नावाने वरळीत झालेल्या बॅनरबाजीमुळे राजकीय वर्तुळात कुतूहल निर्माण झालं आहे. याआधी २००९ मध्ये सचिन अहीर यांच्या रुपानं वरळीतून राष्ट्रवादीचा आमदार निवडून आला होता. सचिन अहिर आता ठाकरेंच्या शिवसेनेत आहेत. त्यामुळे वरळीवर राष्ट्रवादीचा अजित पवार गट दावा करणार का? याबद्दल उत्सुकता निर्माण झाली आहे.

आगामी विधानसभा निवडणूक अत्यंत चुरशीची होणार आहे. अशातच सध्या मुंबईतील वरळी विधानसभा मतदारसंघातून आदित्य ठाकरे आमदार आहेत. २०१९ च्या निवडणुकीत पहिल्यांदा ठाकरेंच्या कुटुंबातील सदस्य निवडणुकीच्या रिंगणात उतरून आमदार झाला होता. अशातच यंदाची निवडणूक वेगळी आहे. शिवसेनेतील अंतर्गत बंडाळीनंतर पहिलीच विधानसभा निवडणूक आहे. अशातच आदित्य ठाकरेंना घेरण्यासाठी महायुतीनं कंबर कसली आहे.

# मनोज जरांगेंची मोठी घोषणा, आता, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी आंदोलन

**जालना :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी लढा देणारे उपोषकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आता शेतकऱ्यांसाठी लढा उभारणार असल्याची घोषणा केली आहे. राज्य सरकारने मराठा समाजाला सगेसोयरे आणि कुणबी प्रमाणपत्र देण्याचे आश्वासन दिलं, पण ते पूर्ण न केल्यामुळे आपण विधानसभा निवडणुकांची तयारी करत असल्याचं मनोज जरांगे यांनी म्हटले आहे. विशेष म्हणजे २९ ऑगस्ट रोजी विधानसभा निवडणुकांसंदर्भात मनोज जरांगे यांच्याकडून घोषणा करण्यात येणार होती, पण त्यांनी आपला निर्णय पुढे ढककला आहे. त्यामुळे, आता शेतकऱ्यांच्या न्याय व हक्कासाठी आपण लढा उभारणार असल्याची घोषणा करत, मनोज जरांगे यांनी पुढचे आंदोलन शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी करणार असल्याचं म्हटले आहे.

आता, शेतकऱ्यांच्या कर्जमाफीसाठी मी आंदोलन करनार असून राज्यातील २८८ विधानसभा मतदारसंघात याच अनुषंगाने बैठका घेणार असल्याचंही त्यानी जाहीर केलं आहे. मतदार संघानिहाय बैठकांमध्ये मराठा आरक्षणासह शेतकरी आणि इतर सर्वच मुद्दे घेण्यात येणार असल्याचं मनोज जरांगे यांनी आजच्या पत्रकार परिषदेतून सांगितलं. लवकरच शेतकऱ्यांसाठी आंदोलन सुरू करणार असून शेतकऱ्यांची कर्जमुक्ती झाली पाहिजे, ही आमची प्रमुख मागणी आहे. शेतकऱ्याची कर्जमाफी आणि पीकविम्याचे पैसे राहिले आहेत, सरकार प्रत्येकवेळी शेतकऱ्यांना फसवते, आता सरकार कसे कर्जमाफी करत नाहीत हे पाहतो, असेही जरांगे यांनी म्हटले.

५ सप्टेंबरपासून घोंगडी बैठका

निवडणुका आल्या की साड्या वाटतात, आताही यांचे तसेच सुरु झाले आहे. सगळे मुद्दे आम्ही ताकतीने लावून धरणार आहोत. त्यासाठी, ५ सप्टेंबर पासून विधानसभा मतदारसंघानिहाय घोंगडी बैठका होणार असल्याची घोषणाही मनोज जरांगे यांनी केली आहे.

पृथ्वीराज चव्हाण यांनी घेतली भेट

मनोज जरांगे यांच्या भेटीसाठी सध्या नेतेमंडळी आणि आमदार, खासदारांच्या रांगा लागल्या आहेत. नुकतेच, माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण यांनीही मनोज जरांगे यांनी अंतरवालीत जाऊन भेट घेतली. मी केवळ त्यांच्या प्रकृतीची चौकशी करण्यासाठी आलो होतो, अस जरांगे यांनी म्हटले.

७०० ते ८०० उमेदवार

''महाराष्ट्रातील ७०० ते ८०० इच्छुक उमेदवारांनी माझी भेट घेतली आहे. पश्चिम महाराष्ट्रातील सर्वाधिक लोकांनी माझ्याशी संपर्क साधला. उमेदवारांचं फार भयाण काम आहे. उमेदवार पाहिले की वाटतं कुठून या लफड्यात पडलो. मरणाचे उमेदवार आहेत. माझ्याकडे ७०० ते ८०० लोक आले. आम्हाला वाटतं होतं की मराठवाड्यातून सर्वाधिक अर्ज येतील, पण सर्वात जास्त अर्ज पश्चिम महाराष्ट्रातून आले आहेत. त्यानंतर नंबर २ ला मराठवाड्यातून आले. आम्ही त्यासाठी लोक बसवलेत. मला त्यातील जास्त काही जमत नाही'', असे जरांगे पाटील यांनी म्हटले आहे.

# मेढा येथे २६ रोजी मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन

**सातारा :** जावली विभागातील दुर्गम भागात असणार्या रुग्णांच्या सेवेसाठी दि. २६ ऑगस्ट रोजी मेढा, ता. जावली येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

सातारा शहरासह जिल्ह्याच्या पश्चिमेकडील भागात मुसळधार पाऊस कोसळला आहे. त्यामुळे साचलेल्या पाण्याने रोगराईचा प्रादुर्भाव सुद्धा वाढला आहे. याचा सर्वाधिक फटका ज्येष्ठ नागरिकांना तसेच महिलांना बसला आहे.

त्या अनुषंगाने जावली तालुक्यासह दुर्गम भागातील रुग्णांच्या सेवेसाठी महेश हॉस्पिटल मेढा, ता. जावली आणि आमदार जी. जी. कदम प्रतिष्ठान यांच्यावतीने मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

या शिबिरामध्ये महिला, जेष्ठ नागरिक तसेच रुग्णांच्या प्राथमिक स्वरूपाच्या तपासण्या करण्यात येणार असून पुढील वैद्यकीय सल्ला देण्यात येणार आहे. सातारा येथील ऑन्को लाईफ कॅन्सर हॉस्पिटलच्या डॉक्टर प्रसाद कवारे आणि महेश हॉस्पिटलच्या डॉक्टर अनुजा कदम यांच्या माध्यमातून तज्ञ डॉक्टरांच्या मदतीने या शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. हे शिबीर मेढा, ता. जावली येथील महेश हॉस्पिटल येथे सकाळी १० ते ५ वाजेपर्यंत सुरु राहणार आहे. तरी जावली विभागातील रुग्णांनी या शिबिराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महेश हॉस्पिटल मेढा तालुका जावली आणि आमदार जी जी कदम प्रतिष्ठान, राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे सातारा जिल्हा कार्याध्यक्ष अमितदादा कदम, साधू चिकणे यांच्यावतीने करण्यात आले आहे.

# हमीभावापेक्षा कमी दरात सोयाबीनची विक्री, किसान सभा आक्रमक

**मुंबई :** सध्या राज्यातील सोयाबीन उत्पादक शेतकरी संकटात सापडला आहे. कारण सोयाबीनच्या दरात मोठी घसरण झाली आहे. शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यानं मोठा फटका बसत आहे. याच मुद्यावरुन किसान सभा आक्रमक झाली आहे. एका बाजूला उत्पादनाचा खर्च वाढत आहे, मात्र, दुसऱ्या बाजूला सोयाबीनला कमी दर मिळत आहे. त्यामुळे सरकारने तातडीने हस्तक्षेप करुन शेतकऱ्यांना होत असलेला तोटा थांबवावा, तसेच आगामी काळात सोयाबीनला जास्त भाव मिळेल यासाठी हस्तक्षेप करावा, अशी मागणी अखिल भारतीय किसान सभेनं केली आहे.

सरकारने जाहीर केलेल्या दरापेक्षा सोयाबीनला ७९२ ते १३९२ रुपये कमी दर



खरीप हंगामातील सोयाबीन बाजारात येण्यापूर्वीच सोयाबीनचे दर घसरले आहेत. सोयाबीनचा उत्पादन खर्च मोठ्या प्रमाणात वाढलेला असताना दुसऱ्या बाजूला सरकारने जाहीर केलेल्या दरापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति क्विंटल कमी दराने शेतकऱ्यांना सोयाबीन विकावे लागत आहे. या परिस्थितीमध्ये सरकारने तातडीने हस्तक्षेप करुन शेतकऱ्यांना होत असलेला तोटा थांबवावा. आगामी काळात सोयाबीनला जास्त भाव मिळतील यासाठी हस्तक्षेप करावा अशी मागणी अखिल भारतीय किसान सभा करत असल्याचे किसान सभेचे नेते अजित नवले म्हणाले.

केंद्र सरकारने सुरू असलेल्या हंगामासाठी सोयाबीनला ४८९२ प्रतिक्विंटल हमीभाव जाहीर केला असताना सध्या शेतकऱ्यांना बाजारामध्ये ३५०० ते ४१०० रुपये प्रतिक्विंटल दराने सोयाबीन विकावे लागत आहे. खरीप हंगामात सुरुवातीला आगाप सोयाबीन बाजारामध्ये विक्रीसाठी येऊ लागले आहे. खरिपातील मुख्य सोयाबीन पिकाची अद्याप आवक सुरू झालेली नाही. असे असताना आत्ताच दर कोसळलेले आहेत. ही परिस्थिती पाहता प्रत्यक्ष खरीप हंगामातील सोयाबीन मोठ्या प्रमाणात जेव्हा बाजारात येईल तेव्हा हे भाव आणखीन खाली जाणार असल्याचे अजित नवले म्हणाले.

सरकारच्या शेतकरीविरोधी धोरणामुळे सोयाबीनचे दर गेले दोन वर्ष सातत्याने घसरत आहेत. आंतरराष्ट्रीय परिस्थितीचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर ११००० रुपये प्रति क्विंटलपर्यंत पोहोचले होते. मात्र, सरकारने तेव्हा तातडीने हस्तक्षेप करत जी.एम. सोयापेंड आयातीचा निर्णय घेतला. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर कोसळायला सुरुवात झाली. सरकारने सोयातेल आयातीला खुले प्रोत्साहन दिले आहे. त्याचा परिणाम म्हणून सोयाबीनचे दर सातत्याने कोसळत आहेत.

हमीभावापेक्षा कमी दर मिळत असल्यानं शेतकऱ्यांवर अन्याय

केंद्र सरकारने मोठा गाजावाजा करून सोयाबीनचे हमीदर जाहीर केले असताना हंगामाच्या अगोदरच शेतकऱ्यांना हमीभावापेक्षा ७९२ ते १३९२ रुपये प्रति क्विंटल तोटा घेऊन सोयाबीन विकावे लागत असेल तर ही अत्यंत अन्यायकारक व खेदजनक बाब आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: MAHMAR17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# के.एस.डी शानभाग विद्यालयाचे शालेय तालुकास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये यश



**योगा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त के. एस. डी शानभाग च्या विद्यार्थिनीं कु. रिया सागर कापसे तसेच, कु. सुभाषी जगदीश शिंदे ,विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.रेखा गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक . भाग्येश कुलकर्णी, क्रीडा विभागप्रमुख .अभिजीत मगर, आणि शिक्षक सौ. सुवर्णा वाघमारे , व सौ.विमल ढेरे.**

**सातारा :** येथील श्यामसुंदरी चॅरिटेबल अँड रिलीजियस सोसायटीचे के. एस. डी शानभाग विद्यालय आणि कला,वाणिज्य व विज्ञान शाखेच्या महाविद्यालयाच्या विद्यार्थिनींनी १४ व १९ वर्ष मुलींचा गटामध्ये जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सातारा द्वारे आयोजित तालुकास्तरीय योगासन स्पर्धेमध्ये यश संपादन केले.

कु. रिया सागर कापसे या ७ वी ब मधील विद्यार्थिनीने उत्कृष्ट कामगिरी करीत १४ वर्षे मुलींच्या वयोगटामध्ये रिदमिक योगा प्रकारात प्रथम क्रमांक प्राप्त केला व पारंपारिक योग प्रकारात पाचवा क्रमांक मिळविला तसेच, कु. सुभाषी जगदीश शिंदे या १० वी ब मधील विद्यार्थिनीने १९ वर्ष मुलींचा वयोगतमध्ये पारंपारिक योगा व रिदामिक प्रकारामध्ये प्रथम क्रमांक नोंदविला आणि उत्कृष्ठ कामगिरी केली. या दोन्ही विद्यार्थिनीचे जिल्हास्तरीय योगासन स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या विद्यार्थिनींना सौ. सुवर्णा वाघमारे यांचे मार्गदर्शन मिळाले व सौ.विमल ढेरे यांचे सहकार्य लाभले.

या यशाबद्दल महाविद्यालयाचे संस्थापक व ज्येष्ठ क्रीडा मार्गदर्शक रमेश शानभाग संस्थेच्या संचालिका सौ.आँचल घोरपडे, विश्वस्त सौ.उषा शानभाग, विद्यालयाच्या मुख्याध्यापिका सौ.रेखा गायकवाड, प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक . भाग्येश कुलकर्णी, क्रीडा विभागप्रमुख .अभिजीत मगर, पालक संघाचे प्रतिनिधी आणि शिक्षक शिक्षकांसह,कार्यालयीन कर्मचाऱ्यांनी अभिनंदन करून पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

# संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या भेटीला पृथ्वीराज चव्हाण

**कराड :** मराठा समाजाच्या आरक्षणासाठी ज्यांनी लढा उभारला असे संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांची माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण यांनी अंतरवाली सराटी येथे जाऊन भेट घेतली. मराठा समाजाला पृथ्वीराज चव्हाण यांनी मुख्यमंत्री असताना पहिल्यांदा आरक्षण दिले असल्याने ही भेट चर्चेची मानली जात आहे.



यावेळी माजी मुख्यमंत्री आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मनोजदादा जरांगे पाटील यांनी मराठा समाजासाठी जो स्वाभिमानी लढा उभारला आहे त्याची इतिहासात तोड नाही. समाजासाठी इतकं निस्वार्थीपणे आंदोलन करून भूमिका घेत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या पाठीशी मराठा समाज कायम सोबत राहील.

यावेळी पत्रकारांनी विचारलेल्या प्रश्नावर बोलताना आ. पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, मराठा समाजाला सर्वात पहिल्यांदा ५०% आरक्षण हे छत्रपती शाहू महाराज यांनी दिले होते. त्यानंतर आमच्या आघाडी सरकारने मी मुख्यमंत्री असताना मराठा समाजाला आरक्षण देण्यासाठी मागासवर्गीय आयोगाचे अध्यक्ष बापट यांना विनंती केली होती परंतु त्यांनी मराठा समाजाला आरक्षण ची गरज नाही असं स्पष्ट सांगून आकडेवारी देण्यास नकार दिला त्यामुळे नारायण राणे यांच्या अध्यक्षतेखाली समिती नेमून वर्षभरात कागदपत्रे गोळा करून मराठा समाजाला शिक्षण व नोकरींमध्ये १६% आरक्षण देण्याचा निर्णय घेऊन त्याबाबत अध्यादेश काढण्यात आला ज्याचा फायदा हजारो मराठा समाजातील युवकांना होत होता. पण कुणीतरी हे आरक्षण मिळू नये म्हणून याचिका दाखल करून मराठा समाजाच्या तरुणांना मिळत असलेला फायदा थांबवला. पुढे फडणवीस मुख्यमंत्री असताना त्यांना कोणताही अधिकार नसताना त्यांनी २०१८ साली आरक्षण देण्याचा आव आणला पण ते फसवे आरक्षण होते. त्यामुळेच ते टिकले नाही कारण आरक्षण देण्याचा अधिकार राज्याकडून २०१८ च्या सुरवातीलाच केंद्र सरकारने १०२ वी घटना दुरुस्ती करून काढून टाकला होता.

हिवाळी अधिवेशनमध्ये पृथ्वीराज चव्हाण यांनी मराठा आरक्षण बाबत माहितीपूर्ण भाषण करीत मराठा समाजाला आरक्षण देण्याची गरज लक्षात घेऊन पहिल्यांदा २०१४ साली कशाप्रकारे आरक्षण दिले याची माहिती दिली होती. तसेच मराठा आरक्षण व संघर्षयोद्धा मनोज जरांगे पाटील यांच्या विरोधात बोलणारे मंत्री छगन भुजबळ जी भूमिका मांडत होते त्यावर पहिल्यांदा पृथ्वीराज चव्हाण यांनी भुजबळ यांना सुनावत भुजबळ यांच्या राजीनाम्याची मागणी केली होती.

## विनापरवाना रॅली काढल्याबद्दल साताऱ्यातील २१ जणांवर गुन्हा दाखल

**सातारा :** सातारा शहरांमध्ये विनापरवाना स्पीकर आणि रॅली काढून जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी सातारा शहरातील २१ जणांवर सातारा शहर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे .सातारा शहरातील व्यापाऱ्यांना जबरदस्तीने दुकाने बंद करण्यासाठी दमदाटी केल्याप्रकरणी या गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे.

यामध्ये दिलीप जगताप, पूजा बनसोडे, प्रतीक गायकवाड, संदीप कांबळे, वैभव गायकवाड, नितीन चव्हाण, बाळकृष्ण देसाई, पांडुरंग माने, विनोद ओव्हाळ, दिलीप सावंत, शरद गाडे, अक्षय कांबळे, विश्वास सावंत, व इतर आठ जणांवर जबरदस्तीने दुकाने बंद केल्याप्रकरणी सातारा शहर पोलिसांनी जबाबदार धरले आहे .सातारा शहरातील शाहू चौक मोती चौक ते जिल्हाधिकारी कार्यालय यादरम्यान दिनांक २१ ऑगस्ट रोजी सकाळी साडे अकरा ते दोन या दरम्यान संबंधितांनी विनापरवाना स्पीकर लावून रॅली काढली तसेच बाजारपेठेतील दुकानदारांना जबरदस्तीने दुकाने बंद केली त्यामुळे जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाचे या प्रकरणात उल्लंघन झाले सातारा शहर पोलिसांनी कलम १८९, ११९ (२) १९०, २२३, व ३५१ दोन प्रमाणे सातारा शहर पोलीस ठाण्यामध्ये गुन्ह्याची नोंद केली आहे पोलीस उपनिरीक्षक एस के जायपत्रे अधिक तपास करत आहेत.

## खाजगी मिळकतीत प्रवेश केल्याप्रकरणी दोघांवर गुन्हा

**सातारा :** सोनगाव तालुका सातारा च्या हद्दीत कुरनेश्वर मंदिराच्या पिछाडीला कोर्टाच्या आदेशाने सील केलेल्या प्लॉटमध्ये अनाधिकाराने प्रवेश केल्याप्रकरणी दोघांवर सातारा तालुका पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दिपाली विजय शिंदे ,विजय सर्जेराव शिंदे राहणार श्री गणेश अपार्टमेंट कुरणेश्वर मंदिराच्या मागे असे संबंधितांचे नाव आहे. नंदकुमार साबळे वय ३३ राहणार शिवथर तालुका सातारा यांनी याप्रकरणी फिर्याद दिली आहे त्यांनी दाखल केलेल्या फिर्यादीनुसार या प्रकरण या प्रकरणातील आरोपींनी न्यायालयाच्या आदेशाचे उल्लंघन करून सील केलेली ५१२ अ प्लॉट क्रमांक २०१(२) मध्ये अनाधिकाराने प्रवेश केला हे प्लॉट कुर्नेश्वर मंदिराच्या मागे आहेत या मिळकती संदर्भात न्यायालयीन प्रक्रिया सुरू होती असे असताना त्यांनी या प्लॉटमध्ये अनाधिकाराने प्रवेश केल्यामुळे त्यांच्यावर गुन्ह्याची नोंद करण्यात आली आहे पोलीस हवालदार निकम अधिक तपास करत आहेत.

## अधिकारी बना, मोबाईल वेडे नाही - रामभाऊ लेंभे.....

**कोरेगाव :** विद्यार्थ्यांनी आपले आयुष्य घडवावे. स्पर्धा परीक्षांचा अभ्यास करून अधिकारी व्हावे. केवळ सोशल मीडियाच्या आहारी जाऊन, मोबाईल वेडे बनण्यापेक्षा करिअर घडवा.असा मोलाचे मार्गदर्शन सातारा जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक,छत्रपती संभाजी महाराज पतसंस्थेचे संस्थापक रामभाऊ लेंभे यांनी केले.

वाघोली ता.कोरेगाव येथील शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेजच्या 'नवागतांचे स्वागत' समारंभ कार्यक्रमात श्री.लेंभे बोलत होते. कार्यक्रमास कोरेगाव बाजार समितीचे संचालक विशाल शिंगटे उपस्थित होते. शंकरराव जगताप आर्ट्स अँड कॉमर्स कॉलेज, वाघोली महाविद्यालयातील तुमचा प्रवेश उज्वल भविष्याची नांदी आहे. असे गौरव उद्गार श्री. शिंगटे यांनी आपल्या मनोगतात व्यक्त केले. महाविद्यालयाचा सर्व स्टाफ व कर्मचारी गुणवंत आहे. त्यांनी राबवलेल्या उपक्रमांचा लाभ सर्व विद्यार्थ्यांनी घ्यावा. ग्रंथालय , कम्प्युटर अकॅडमीच्या माध्यमातून कौशल्य विकसित करावीत. मी आणि आमचा सर्व स्टाफ तुमच्या मदतीला सदैव तयार आहे. असे विचार आपले अध्यक्षीय मनोगतात महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.

# प्रा. भगवान वाजे अलिबागकर यांना पीएच.डी.पदवी प्रदान



**मायणी :** प्रा. भगवान नारायण वाजे अलिबागकर यांनी शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथुन शिक्षणशास्त्र विषयात संशोधनाचे कार्य पूर्ण केल्याबद्दल कोल्हापूर विद्यापीठा कडून त्यांना पी.एचडी.पदवी प्रदान करण्यात आली.

'विज्ञान शिक्षकांच्या आकलन विकसनासाठी ज्ञान संच निर्मिती ' या विषयावर त्यांनी आपले संशोधन पूर्ण केले असून या संशोधन कार्यासाठी त्यांना शिक्षणशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर येथील डॉ. कृष्णा पाटील व डॉ. निलिमा सप्रे यांचे मार्गदर्शन मिळाले. तसेच विभाग प्रमुख डॉ. चेतना सोनकांबळे, डॉ. एम. एस. पद्मिनी डॉ. पी. एस.पाटणकर, डॉ. जी. एस. पाटील, डॉ. विद्यानंद खंडागळे, डॉ. रूपाली संकपाळ यांचे मार्गदर्शन व सहकार्य मिळाले.

डॉ. भगवान वाजे अलिबागकर हे ह.भ.प. श्री नारायण दादा अलिबागकर महाराज यांचे कनिष्ठ चिरंजीव असून ते सध्या रयत शिक्षण संस्थेच्या, विठ्ठलराव देशमुख अध्यापक विद्यालय, माहूली जि. सांगली येथे कार्यरत आहेत. त्यांच्या यशाबद्दल मा.श्री.आबासाहेब देशमुख (काका) रयत शिक्षण संस्थेच्या मॅनेजिंग कौन्सिलचे माजी सदस्य यांनी अभिनंदन केले . तसेच माहुली शैक्षणिक संकुलातील प्राचार्य ,प्राध्यापक, शिक्षकेत्तर कर्मचारी आणि ग्रामस्थ यांनी डॉ. वाजे यांचे अभिनंदन केले.

# महिला अत्याचाराच्या विरोधात वंचित बहुजन आघाडीचे

सातारा : संपूर्ण महाराष्ट्रात महिला अत्याचाराच्या घटना वाढलेल्या आहेत .मुंबई, पुणे, लातूर, अकोला, बदलापूर या विविध शहरांमध्ये लहान मुली व महिलांना अत्याचारांना तोंड द्यावे लागत आहे. या घटनांकडे राज्य शासनाने संवेदनशीलपणे लक्ष दिले पाहिजे .याकरता ठोस उपाययोजना करणे आवश्यक आहे या मागणीसाठी वंचित बहुजन आघाडी सातारा यांचे वतीने जिल्हाधिकारी कार्यावर धरणे आंदोलन करण्यात आले



या मागण्यांचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील यांना देण्यात आले .वंचित आघाडीचे जिल्हाध्यक्ष बाळकृष्ण देसाई, जिल्हा महासचिव गणेश भिसे, यांच्यासह संदीप कांबळे, पल्लवी काकडे, माया कांबळे, लक्ष्मीबाई कांबळे, शशिकांत गंगावणे, सुरेश बैले, अधिकराव सोनवणे,आबा बैले, शहाजी किरत, मोहम्मद पालकर, सायली भोसले, यांनी या आंदोलनात भाग घेतला होता या निवेदनात नमूद आहे की बदलापूर येथील चिमुरडीवर अत्याचार करणाऱ्या आरोपीवर खटला फास्टट्रॅक कोर्टात सुरू करून एक वर्षाच्या आत फाशी द्यावी, बदलापूरच्या पीडित कुटुंबांना महिला बालकल्याण विभागाच्या वतीने ५० लाख रुपये रक्कम देण्यात यावी,संबंधित शिक्षण संस्था संचालक यांच्यावर गुन्हे दाखल करून संस्थेची मान्यता रद्द करावी, संभाजीनगर येथील प्रवचनाच्या दरम्यान रामगिरी महाराज यांनी मुस्लिम धर्मियांचे धर्मगुरू मोहम्मद पैगंबर यांच्या बद्दल बेताल वक्तव्य केले त्यामुळे मुस्लिम समाजाच्या भावना दुखावल्या आहेत हिंदू मुस्लिम ऐक्य बिघडवण्यासाठी जाणीवपूर्वक प्रयत्न करणाऱ्या रामगिरी महाराजांवर गुन्हा दाखल करावा,कोलकत्ता येथील डॉक्टरचे शिक्षण घेणाऱ्या तरुणीवर अत्याचार करून तिचा खून करण्यात आला या घटनेतील आरोपींना खटला चालवून तात्काळ फाशी द्यावी अशा विविध मागण्या सादर करण्यात आले आहेत . या आंदोलनादरम्यान लाडकी नको सुरक्षित बहीण हवी अशा आशयाचे फलक झळकविण्यात आले .

या मागण्यांच्या संदर्भात संवेदनशील विचार व्हावा तसेच समाजामध्ये जाणीवपूर्वक जनजागृती करण्यात यावी अन्यथा येत्या काळामध्ये तीव्र स्वरूपाची आंदोलन उभे राहावे लागेल, यावेळी कायदा सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण झाल्यास त्याची

# लोणंद पोलीसांच्या निर्भया पथकाकडुन विद्यार्थिनींना मार्गदर्शन

**लोणंद :** लोणंद पोलीसांच्या निर्भया पथकाकडुन राज्यातील वाढत असलेल्या महिला अत्याचारांच्या घटनांच्या पाश्र्वभूमीवर पाडेगाव येथील समता प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालय येथे प्रबोधनात्मक कार्यक्रम घेवून मुलींच्यात जागरूकता निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

नुकत्याच बदलापूर येथे अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचाराच्या घटनेनंतर सातारा पोलीस दल अलर्ट मोडवर आलेले असून शालेय मुलींच्यामधे जागरूकता निर्माण करण्याच्या हेतूने पाडेगाव येथील समता आश्रम शाळेत सपोनि सुशिल भोसले यांच्ये मार्गदर्शनानुसार लोणंद पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक विशाल कदम, निर्भया पथक प्रमुख भोसले मॅडम, गोपनीय अंमलदार सतिश दडस,अविनाश नलावडे तसेच संपूर्ण निर्भया टीम यांच्या माध्यमातून प्रबोधनात्मक कार्यक्रम सादर करण्यात आला.यावेळेस मुलींनी जागरूक राहणे किती जरुरीचे आहे तसेच आपण वावरत असताना आपल्या आजूबाजूला आपल्याबद्दल काही चुकीचे घडत असेल तर आपण निर्भया पथक यांच्याशी किंवा लोणंद पोलीस ठाण्याशी संपर्क साधने कसे आवश्यक आहे. तसेच मुलींनी पुस्तक प्रेमी बना , पुस्तक प्रेमी बनाल तर आयुष्य घडेल तसेच सर्व क्षेत्रांमध्ये महिला आघाडीवर आहेत. आपण आपले आवडीचे क्षेत्र निवडा तसेच गुड टच, बॅड टच बाबत माहिती दिली तसेच समता प्राथमिक, माध्यमिक आश्रमशाळा व कनिष्ठ महाविद्यालय पाडेगाव या आश्रमशाळेवर निर्भयाचे फ्लेक्स लावून आपत्कालीन परिस्थितीत मुलींनी निर्भया हेल्पलाइन तसेच भ्रमणध्वनीवर वर संपर्क करण्याचे आवाहन करण्यात आले.

यावेळेस याप्रसंगी मांगल्य शिक्षण प्रसारक संस्थेचे सचिव पवन सुर्यवंशी, माध्यमिक आश्रमशाळेचे मुख्याध्यापक उत्तम माने, कनिष्ठ महाविद्यालयाचे प्राचार्य नामदेव बिजले, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी तसेच विद्यार्थी व विद्यार्थिनी उपस्थित होते. पर्यवेक्षक प्रदीप नलावडे यांनी आभार मानले.

# काटवलीचे ग्रामदैवत जननी, केदारेश्वर मंदिराचा कलशारोहण व मूर्ती प्रतिष्ठापना उत्साहात

**वाई :** ग्रामदैवत जननी , केदारेश्वर मंदिर हे काटवलीच्या आध्यात्मिक व धार्मिक परंपरेचे श्रद्धास्थान आहे. ग्रामस्थ व भक्तांनी कायम मंदिराच्या संपर्कात राहिल्यास आपल्या सभोवतलची सर्व नकारात्मक ऊर्जा नाहीशी होणार आहे. काटवलीचा सामाजिक व धार्मिक एकोपा या मंदिराच्या निमित्ताने कायम टिकणार असल्याचे प्रतिपादन वाईचे मठाधिपती महादेव शिवाचार्य वाईकर महाराज यांनी केले.



काटवली (ता. जावळी) येथील मंदिरात श्री जननी,केदारेश्वर आणि जानाई तसेच श्री गणेश, श्री साईबाबा, श्री शंकर, गरुड आणि शिपाई या देवांच्या मूर्ती प्रतिष्ठापना व कलशारोहण समारंभ प्रसंगी वाईचे मठाधिपती महादेव शिवाचार्य वाईकर महाराज मार्गदर्शन करीत होते.

दीर्घकाळानंतर जननी देवी मंदिरास पूर्णत्व आल्याने सर्वांच्याच चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहतोय. असे मंदिर दुर्मिळ मंदिर असून काटवली चे वैभव वाढविणारे आहे. त्यामुळे येथे भविष्यात पर्यटक सुध्दा येतील. आपल्या मनातील नकारात्मक ऊर्जा संपवण्यासाठी मंदिरांचा उपयोग होत असून हा लोकोत्सव कौतुकाचा सोहळा आनंद देणारा असल्याचेही यावेळी मठाधिपती महादेव शिवाचार्य वाईकर यांनी सांगितले.

हजारो भाविकांच्या उपस्थितीत जननी देवी तसेच ज्ञानेश्वर मंदिराचा कलशारोहण आणि मूर्तीचा प्राण प्रतिष्ठापना सोहळा संपन्न झाला. दरम्यान तीन दिवस मंदिरात होमहवन, पूजापाठ, तीर्थ प्रसाद आणि विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

या मंदिराचे बांधकाम वीस वर्षापूर्वी ग्रामस्थांनी लोक सहभाग व दात्यांच्या मदतीतून केले होते. यावेळी मंदिराचे सुशोभीकरण करण्यात आले असून मंदिरातील मुख्य मूर्तींचे गावात बैलगाडीतून भव्य असे स्वागत करण्यात आले. या मिरवणुकीत डोक्यावर कलश घेवून महिला सहभागी झाल्या होत्या तसेच शालेय मुले व महिलांचे लेझिम पथक मुख्य आकर्षण ठरले. ठिकठिकाणी या मूर्तींचे औक्षण करून स्वागत करण्यात आले. त्यानंतर या मूर्तींची प्रतिष्ठापना करण्यात आली .

हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ग्रामस्थ, युवक, व महिला यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमास काटवली ग्रामस्थ, पै पाहुणे तसेच परिसरातील नागरिक व भक्तगण मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## शरद पवार गटाची आजच्या बंद मधून माघार

**मुंबई:** कोणत्याही राजकीय पक्षाला बंद पुकारण्याचा हक्क नाही, असे स्पष्ट निर्देश मुंबई उच्च न्यायालयाने दिल्यानंतर महाविकास आघाडीने उद्या पुकारलेल्या बंद मधून माघार घेण्याचा निर्णय राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे प्रमुख शरद पवार यांनी घेतला आहे. उच्च न्यायालयांच्या निर्देशांना त्वरित सर्वोच्च न्यायालयात आव्हान देणे शक्य नसल्यामुळे संविधानाचा आदर ठेवून बंद मधून माघार घेत असल्याचे पवार यांनी स्पष्ट केले आहे.

बदलापूर येथे चिमुकल्या विद्यार्थिनींवर झालेल्या लैंगिक अत्याचाराच्या प्रकरणानंतर महिला व मुलींवर होणाऱ्या लैंगिक अत्याचाराच्या निषेधार्थ महाविकास आघाडीने उद्या बंदची हाक दिली आहे. मात्र, राजकीय पक्षांना बंद पुकारण्याचा हक्क नसल्याचे मुंबई उच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे.

# कर्जमुक्ती आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांना मुंबईत अटक



**मुंबई :** राज्यातील शेतकऱ्यांची कर्जमुक्ती, हक्काचा पिकविमा, सोयाबीन-कापूस दरवाढ यासह शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसाठी मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' निवासस्थानी शेतकऱ्यांनी आत्महत्येचे प्रात्यक्षिक आंदोलन करताना शेतकऱ्यांना मुंबईत मरीन ड्राइव्ह पोलिसांनी अटक केली.

शेतकरी नेते रविकात तुपकर यांनी या आंदोलनाची हाक दिली होती. त्यांनाही अटक करून किल्ला कोर्टात हजर करण्यात आले. न्यायालयाने त्यांची १५ हजार रुपयांच्या वैयक्तिक मुचलक्यावर सुटका केली. पोलिसांना चकमा देत शेतकरी मुंबईत दाखल झाले होते. सगळे एकत्र गेलो तर पकडले जाऊ त्यामुळे काही शेतकरी वेगवेगळ्या ग्रुपने मुंबईत दाखल होऊन आंदोलनाच्या स्थळी पोहोचतील असे नियोजन तुपकारांचे होते. तर दुसरीकडे मुंबईत येणाऱ्या प्रत्येक मार्गावर पोलिसांचा बंदोबस्त लावण्यात आला होता. तरीही पोलिसांना चकमा देऊन मुख्यमंत्र्यांच्या 'वर्षा' या निवासस्थानाकडे निघाले होते.

## श्रावणी संकष्टीचे औचित्य साधून
# कराड अर्बन बँकेची वाई येथे ६४ वी शाखा ग्राहक सेवेत रुजू



**कराड :** दि कराड अर्बन को-ऑपरेटिव्ह बँक. लि., कराड ची ६४ वी शाखा वाई जि. सातारा येथे श्रावणी संकष्टीचे औचित्य साधून दि.२२ ऑगस्ट पासून ग्राहक सेवेत रूजू झाली. नवीन शाखेचा शुभारंभ बँकेचे ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी यांच्या हस्ते व अध्यक्ष डॉ. सुभाष एरम, उपाध्यक्ष समीर जोशी, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ. अनिल लाहोटी व मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये पार पडला. यावेळी शाखेच्या ठिकाणी सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते.

भारतीय रिझर्व्ह बँकेने सदृढता व सक्षमतेच्या आधारावर कराड अर्बन बँकेस २०२४-२५ सालात सातारा जिल्ह्यात सातारा एम.आय.डी.सी. व वाई अशा दोन तर सोलापूर जिल्ह्यातील बार्शी, पंढरपूर व सांगोला या तीन अशा एकूण पाच नवीन शाखा सुरू करण्यास परवानगी दिली आहे. यापैकी आज वाई येथील शाखेचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी नवीन शाखेच्या कर्जदारांना वैयक्तीक दुचाकी-चारचाकी तसेच व्यवसायिक वाहनांचे वितरण याचबरोबर ठेवीदारांना ठेव पावत्यांचे वितरण ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

बँकेची स्थापना ही स्वातंत्र्यपूर्व काळात झालेली असून बँकेच्या जडणघडणीमध्ये अनेक थोरामोठांचे योगदान लाभले आहे. स्थापनेवेळी ज्या तत्वांच्या आधारे ही बँक स्थापन केली तीच पारदर्शकता, राजकारण विरहीत व निस्वार्थी कारभार ही तत्वे कायम ठेवत गेल्या १०७ वर्षांपासून विश्वासार्ह ग्राहकसेवा देत आहे. सर्वसामान्यांची विश्वासाची बँक अशी आपल्या कराड अर्बन बँकेची ओळख आहे. बँकेने अनेक होतकरू व कष्टाळू युवकांना पतपुरवठा करत यशस्वी होण्यासाठी मदत केली असल्याची माहिती बँकेचे अध्यक्ष डॉ.सुभाष एरम यांनी दिली.

कराड अर्बन बँक स्व. डॉ. द. शि. एरम आणि ज्येष्ठ संचालक सुभाषराव जोशी यांच्या मार्गदर्शनाने आणि डॉ.सुभाष एरम यांच्या अध्यक्षतेखाली मोठी होत आहे. बँक चालू वर्षाच्या अखेरील ६७ शाखा आणि एकूण व्यवसायाचा ५७०० कोटींचा टप्पा पूर्ण करणार असल्याचा विश्वास यावेळी बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव यांनी व्यक्त केला. बँकेच्या संचालक मंडळाने अधिकारांचे विकेंद्रीकरण करत मुक्त व्यवस्थापन स्विकारले आहे. यामध्ये सेवकांना पदनिहाय अधिकार प्रदान केले, यामुळे निर्णय क्षमता गतिमान झाली आणि पर्यायाने बँकेच्या व्यवसायात वाढ होत आहे. बँकेमध्ये सीए., सी.एस., आय. सी.डब्लू.ए., एल.एल.एम. तसेच तांत्रिक व सिव्हील इंजिनिअर असे उच्च शिक्षित सेवक असल्यामुळे बँकेस कोणत्याही कारणास्तव आउट सोर्सिंग करावे लागत नाही. तसेच बँकेद्वारे अल्प व्याजदराच्या विविध कर्ज योजना राबविल्या जातात. यामध्ये केंद्र व राज्य शासनाच्या सबसिडीचा लाभ देणाऱ्या योजनांचासुद्धा सहभाग आहे. याचप्रमाणे बचतीसाठी तुलनेने उत्तम व्याज परताव्याच्या ठेव योजनासुद्धा दिल्या जातात. बचत व चालू ठेव खात्यांना रूपे ए.टी.एम. कार्ड, क्यू.आर कोड, व्हॉट्सअप बँकींग, आर. टी.जी.एस./एन.ई.एफ.टी., आय.एम. पी.एस./एम.पी.ओ.एस. या सेवांचा समावेश केला असून ग्राहकांच्या संरक्षणासाठी लाईफ व जनरल इंश्युरन्स सेवासुद्धा उपलब्ध करून दिली आहे. याचबरोबर नुकतीच रिझर्व्ह बँकेने मोबाईल बँकिंगसाठी परवानगी दिली असल्याची माहिती मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव यांनी दिली.

बँकेचे उपमहाव्यवस्थापक विजय काकडे यांनी स्वागत व प्रास्ताविक तर आभार सहाय्यक महाव्यवस्थापक संतोष गायकवाड यांनी मानले. यावेळी बँकेचे उपाध्यक्ष समीर जोशी, व्यवस्थापन मंडळाचे अध्यक्ष डॉ.अनिल लाहोटी व सर्व संचालक, महाव्यवस्थापक, बँकेचे सेवक तसेच वाई व परिसरातील ग्राहकांनी उत्स्फूर्तपणे उपस्थिती दर्शवली.

मागील वर्षी दि.२१ ऑगस्ट रोजी विजापूर रोड सोलापूर आणि दि.२२ ऑगस्ट रोजी बारामती या दोन शाखा सुरू करण्यात आल्या होत्या. दोन्ही शाखांनी पहिल्या वर्धापनदिनी अनुक्रमे २५ कोटी व २० कोटींची व्यवसायपूर्ती केली आहे. बँक व्यवस्थापनाने निश्चित केलेल्या उद्दीष्टांपेक्षा दोन्ही शाखांनी दुपटीहून अधिक व्यवसाय साध्य केला असून याबद्दल बँकेचे अध्यक्ष डॉ. सुभाष एरम, ज्येष्ट संचालक सुभाषराव जोशी, उपाध्यक्ष समीर जोशी व मुख्य कार्यकारी अधिकारी सीए. दिलीप गुरव यांनी सर्व सेवकांचे अभिनंदन केले.



## बीडीसी पाटणचे महा-सेट २०२४ परीक्षेत यश

. **पाटण :** येथील बाळासाहेब देसाई कॉलेज मधील विज्ञान शाखेतील प्रा. सुमित लाड यांनी रसायनशास्त्र विषयामधून सेट परीक्षा उत्तीर्ण झाले.त्यांच्या यशाबद्दल युवा नेते मा. सत्यजितसिंह पाटणकर, कोयना एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष डॉ. सोपानराव चव्हाण, जनरल सेक्रेटरी श्रीमंत अमरसिंह पाटणकर, संचालक श्रीमंत याज्ञसेन पाटणकर, मा. संजीव चव्हाण व महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एस. डी. पवार, रसायनशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विलास कळंत्रे, अधीक्षक श्री. विजय काटे तसेच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय सेवक यांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# लाडक्या भावांनो जबाबदारी स्विकारून राजीनामा दयावा

## छ. शिवाजी महाराज चौकात अर्धातास रस्तारोको

## महाविकास आघाडीच्या महिलांची निषेध मोर्चातून मागणी



वडूज : बदलापूर येथील नामांकित शाळेमध्ये दोन चिमकुल्यावर अत्याचाराची घटना घडली असून त्या घटनेच्या व युती सरकारच्या निषेधार्थ खटाव तालुक्यातील उबाठा, काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गटाच्या वतीने तहसिलदार कचेरीवर मोर्चा काढण्यात आला. याप्रंसगी मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री या लाडक्या भावांनी जबाबदारी स्विकारून तात्काळ राजीनामा दयावा अशी मागणी महाविकास आघाडीच्या महिलांमधून करण्यात आली.

बदलापूर मधील ११ तास उशिरा गुन्हा दाखल करून अटक केलेल्या नराधमाला फाशीची शिक्षा व्हावी. संबधीत शिक्षण संस्थेची मान्यता रद्द करून त्याही नराधमांना योग्य ती शिक्षा करावी. हे महाराष्ट्र मिंदे राज्य सरकार महिलांच्या संरक्षणाच्या बाबतीत सपशेल अपयशी ठरले असून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व गृहमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी लाडक्या बहिणीवर झालेल्या अन्यायाची नैतिक जबाबदारी स्विकारून तात्काळ राजीनामा दयावा अशी मागणी करत नायब तहसीलदार आर. एच. दबडे यांना निवेदन देत राज्य सरकारसाठी महिलांच्यावतीने बांगड्यांचा आहेर सुर्पूत केला.

यावेळी शिवसेना उबाठा जिल्हा प्रमुख सातारा महिला संघटिका सलमा शेख, शिवसेना उबाठाचे तालुकाध्यक्ष शहाजीराजे गोडसे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती विजयराव शिंदे, राष्ट्रीय काँग्रेसचे माण विधानसभा अध्यक्ष डॉ. महेश गुरव, राष्ट्रवादी एस. पी. युवक गटाचे अध्यक्ष योगेश जाधव, राष्ट्रवादी महिला अध्यक्षा डॉ. प्रियांका माने, राष्ट्रीय काँग्रेसचे निलेश घार्गे, बाजार समितीचे संचालक संकेत म्हामणे, सलमा शेख, काजल बुचडे, स्वाती शिंगाडे, कांचन जाधव, सुशांत पालेकर, संतोष दुबळे, आबासाहेब भोसले, दाऊद मुल्ला, अजीत देवकर, संजय जगताप, मधुकर मोहिते, धनंजय चव्हाण, आनंदा साठे,लखन पवार, पोपट बागल, राजेंद्र जगदाळे, तुषार माने, संभाजी सोनवणे यासह शिवसेना उबाठा, राष्ट्रीय काँग्रेस, राष्ट्रवादी शरद पवार गट, प्रहार संघटनेसह विविध संघटनाचे कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते.

येथील छ .शिवाजी महाराज चौकात अर्धा तास रस्ता रोको करण्यात आले. त्यानंतर एसटी स्टँड परिसरात थोडावेळ रस्ता रोको करणेत आला. यावेळी 'मिंदे' सरकार हाय हाय, आरोपीला पाठीशी घालणाऱ्या सरकारचा धिक्कार असो, इडी सरकार हाय हाय, आरोपीला फाशी झालीच पाहिजे, पिडीतेला न्याय मिळालाच पाहिजे अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.



## महाविकास आघाडीच्या वतीने जुन्नर तालुक्यात महिलांवरील अत्याचाराचा निषेध

### तर आमदार अतुल बेनके यांनी पाठवले सरकारला पत्र

**नारायणगाव :** बदलापूर व कोलकत्ता घटनेचे जुन्नर तालुक्यात तीव्र पडसाद उमटले असून जुन्नर, ओतूर व नारायणगाव या ठिकाणी राष्ट्रवादी शरद पवार गट उद्धव बाळासाहेब ठाकरे गट व काँग्रेसच्या वतीने घटनेचा जाहीर निषेध करण्यात आला तर शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या वतीने नारायणगाव येथे निषेध मोर्चा काढण्यात आला.

याशिवाय जुन्नर तालुक्याचे आमदार अतुल बेनके यांनी मुख्यमंत्री उपमुख्यमंत्री व गृहमंत्री यांना पत्र पाठवून या निंदनीय घटनेचा निषेध व्यक्त केला आहे.

बदलापूर कोलकता येथे एक महिला डॉक्टर व दोन चिमुरड्यांवर झालेल्या बलात्कार व अत्याचाराच्या निषेधार्थ जुन्नर तालुक्यातील नारायणगाव येथे शिवसेना ठाकरे गटाच्या वतीने निषेध मोर्चा काढण्यात आला

यावेळी आमदार माजी आमदार बाळासाहेब दांगट तालुकाप्रमुख माऊली खंडागळे माजी जिल्हा परिषद सदस्य गुलाब पारखे माजी उपजिल्हाप्रमुख शरद चौधरी माजी तालुकाउपप्रमुख मंगेश काकडे बाबा परदेशी उपसरपंच योगेश उर्फ बाबू पाटे विकास नाना तोडकरी संतोष वाजगे आरिफ आतार डॉ अनुष्का शिंदे मोहन बांगर बाळासाहेब बांगर नंदकुमार अडसरे ईश्वर पाटे तसेच नारायणगाव ग्रामपंचायतचे सदस्य व ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी उपस्थित सर्वांनीच आरोपींचा व आरोपींवर कारवाई करण्यास दिरंगाई करणाऱ्या शासनाचा निषेध केला.

## प्रहार जनशक्तीच्यावतीने डीवायएसपींना निवेदन

### टेंभूतील 'त्या' महिलेला पाठबळ देणाऱ्या पोलिसांची चौकशी करा



**कराड :** टेंभू ता. कराड येथे एक महिला अनेक वर्षापासून दारू विक्री व्यवसाय करीत आहे. आश्रमाच्या माध्यमातून ही महिला अनेकांना वेश्या व्यवसाय करण्यास भाग पाडत असल्याची तक्रार समोर आली आहे. असे असताना पोलिसांनी कारवाई का केली नाही? पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. त्यामुळे आजवर त्या महिलेला पाठबळ देणाऱ्या पोलिसांचीच चौकशी करून कठोर कारवाई करावी अशी मागणी प्रहार जनशक्ती पक्षाच्यावतीने मनोज माळी यांनी डीवायएसपी अमोल ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

दिलेल्या निवेदनात म्हंटले आहे की, संबंधित महिला अनेक वर्षापासून दारू विक्री करीत आहे. या बाबत स्थानिक नागरिकांनी अनेकदा तालुका पोलिसांकडे कारवाई करण्याची मागणी केली होती, मात्र पोलीसानी कोणतीही कारवाई न करता त्या महिलेस अभय देण्याचे काम केले आहे, याबरोबर आश्रमाच्या माध्यमातून ही महिला सेक्स रॅकेट चालू असलेली बाब सध्या समोर आली आहे, मात्र अनेक वर्ष गावात ही महिला अवैध दारू व्यवसाय व वेश्या व्यवसाय करत असताना पोलिसांनी का कारवाई केली नाही ? वास्तविक अवैद्य व्यवसायाबाबत पोलिसांची भूमिका संशयास्पद आहे. त्यामुळे आजवर या महिलेच्या अवैद्य व्यवसायांना पाठबळ देणाऱ्या पोलिसांची चौकशी करून त्यांच्या कठोर कारवाई करावी.

ही महिला राबवत असलेल्या सेक्स रॅकेटमध्ये काही पोलीस कर्मचारी व राजकीय पुढारी व त्यांची नातेवाईकांचा सहभाग असल्याची जोरदार चर्चा आहे. काही टीव्ही चॅनेल वरून ही याबाबत बातम्या प्रसिद्ध झालेले आहेत. त्यामुळे या सेक्स रॅकेटच्या मुळापर्यंत जाऊन तपास करावा व दोषी आढळणाऱ्या सर्वांवर कायद्याचे कारवाई करावी तसेच टेंभू गावात आज ही मटका, जुगार, अवैध दारू विक्री सुरू आहे. टेंभूत सुरू असलेल्या अवैध व्यवसायामुळे थोर समाज सुधारक गोपाळ गणेश आगरकर यांचे नावाला गालबोट लागत आहे.

तरी टेंभू तसेच कराड तालुक्यातील चालू असलेल्या मटका, अवैद्य दारू विक्री, वेश्या व्यवसाय इत्यादी अवैध धंदे तात्काळ बंद करण्यात यावीत. अन्यथा प्रहार जनशक्ती पक्षाचे वतीने तीव्र स्वरूपाच्या आंदोलन करण्यात येईल. यावेळी भीमशक्ती संघटनेचे जिल्हाध्यक्ष माजी नगरसेवक आनंदराव लादे, भानुदास डाइंगडे, प्रवीण शिंदे, भैय्या माळी, बंटी भाऊ मोरे, जयदीप आचार्य, संदेश नलावडे, मनीषाताई चव्हाण, निर्मलाताई राठोड व पदाधिकारी उपस्थित होते.



## ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांचा वाढदिवस उत्साहात

**मुंबई :** मुंबई मराठी पत्रकार संघाच्या विश्वस्त, ज्येष्ठ पत्रकार राही भिडे यांचा वाढदिवस पत्रकार संघात केक कापून साजरा करण्यात आला. यावेळी पत्रकार संघाचे अध्यक्ष संदीप चव्हाण, उपाध्यक्ष स्वाती घोसाळकर कार्यकारीणी सदस्य अंशुमन पोहरेकर, आवाज इंडियाचे न्यूज एडिटर अजय चांदेकर, ज्येष्ठ छायाचित्रकार प्रदीप कोचरेकर, पत्रकार संतोष गायकवाड, रवींद्र भोजने, शिरीष वानखेडे, रमेश आवताडे, प्रशांत कांबळे, उमेश गुजराथी, सुबोध शाक्यरत्न, राजेंद्र साळसकर, अकबर खान, आणि पत्रकार संघातील कर्मचारी उपस्थित होते.तसेच राही भिडे यांच्या वाढदिवसानिमित्त लातूर येथील सिद्धार्थ सुर्यवशी यांनी रुग्णांना फळे वाटून साजरा केला. अशाच प्रकारचे अनेक कार्यक्रम इतरत्र घेण्यात आले.

# तासगाव तालुक्यातील ४१ वॉटर एटीएमचे पाणी दूषित

## 'त्या' ४१ वॉटर एटीएम वर तात्काळ बंदी

**तासगाव ;** तासगाव तालुक्यातील १५२ वॉटर एटीएमचे पाणी तपासणीसाठी पाठवले होते. यापैकी १०३ वॉटर एटीएमचा पाणी तपासणी अहवाल प्राप्त झाला आहे. यातून ४१ वॉटर एटीएमचे पाणी दूषित व पिण्यासाठी अयोग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला आहे. त्यानुसार तालुक्यातील ४१ वॉटर एटीएमना तात्काळ बंद करण्याचे आदेश गटविकास अधिकारी डॉ.संताजी पाटील व तालुका आरोग्य अधिकारी डॉ. विशाल करांडे यांनी दिले आहेत.

जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.विजयकुमार वाघ यांनी जिल्ह्यातील सर्व वॉटर ए.टी.एम. च्या पाण्याची तपासणी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यानुसार, तासगाव तालुक्यातील १५२ वॉटर एटीएम मशीन मधील पाणी तपासण्यासाठी पाठवले होते. आतापर्यंत १५२ पैकी १०३ वॉटर एटीएमचे पाणी तपासणी अहवाल प्राप्त झाले आहेत. यामध्ये तालुक्यातील ४१ वॉटर एटीएमचे पाणी दूषित व पिण्यासाठी अयोग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाला. त्यानुसार तालुक्यातील ४१ वॉटर एटीएमना तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत. अशी माहिती गटविकास अधिकारी डॉ.संताजी पाटील व तालुका आरोग्य अधिकारी डॉ.विशाल करांडे यांनी दिली.

तर,दूषित पाणी असलेले ४१ वॉटर एटीएम पुढील प्रमाणे :- कौलगे-१, वासुंबे-१, सावर्डे सावर्डे -२, कवठेएकंद-३, हातनूर-३, गोटेवाडी- १, कचरेवाडी-१, हातनोली-१, पाडळी-१, पेड-३, विसापुर-३, धुळगाव-१, गव्हाण-१, मनेराजुरी-२, कुमठे-१, मांजर्डे-४, मोराळ-१, पुनदी-१, नवी डोर्ली-१, बलगवडे-१, वायफळे-१, येळावी-२, जुळेवाडी-२, तुरची (हणमंतपूर)-१, तुरची (कारखाना)- १ यांचा समावेश आहे. या दूषित पाणी असलेल्या 'त्या' सर्व वॉटर एटीएमनी आवश्यक ती दुरुस्ती तसेच, फिल्टरची बदली व क्लोरीनेशन करुन पाणी फेर तपासणीसाठी पाठविण्याचे आहे व पाणी पिण्यासाठी योग्य असल्याचा अहवाल प्राप्त झाल्यानंतरच वॉटर एटीएम सुरु करण्यात यावे असे आदेश दिले आहेत.

**६८ गावातील ४१ वॉटर एटीएमचे पाणी दूषित**

**तासगाव तालुक्यातील ८ प्राथमिक आरोग्य केंद्र अंतर्गत येणाऱ्या ६८ गावांमधील १५२ वॉटर एटीएम मधील पाणी तपासणीसाठी पाठवले होते. आतापर्यंत १०३ पाणी नमुन्यांचे अहवाल प्राप्त झाले आहेत. यामधील १०३ पैकी ४१ वॉटर एटीएमचे पाणी दूषित असल्याचे आढळून आले आहे. दूषित पाणी असणाऱ्या वॉटर एटीएमना तात्काळ बंद करण्याचे आदेश दिले आहेत.**

**डॉ.विशाल करांडे**
**तालुका आरोग्य अधिकारी, तासगाव**